# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांकः09.08.2024 वारःशुक्रवार

---

1. आगामी स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर, देशात आजपासून हर घर तिरंगा अभियान
2. बांगलादेशात हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ महंमद युनूस यांनी घेतली शपथ
3. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जय शंकर आजपासून 3 दिवसांच्या मालदिव दौऱ्यावर आणि
4. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भालाफेकपटू नीरज चोप्राची रौप्य पदकाला गवसणी; तर भारतीय पुरुष हॉकी संघाला कास्य पदक

**<u>हर घर तिरंगा</u>**

आगामी स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर, देशात नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी आजच्या ऑगस्ट क्रांति दिनापासून ते 15 या दरम्यान नागरिकांनी आपल्या घरावर डौलाने तिरंगा फडकवावा आणि त्याबरोबर सेल्फी घेऊन तो फोटो हर घर तिरंगा संकेतस्थळावर आपलोड करावा, अस आवाहन केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांनी केल आहे. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. या अभियानाची माहिती देताना शेखावत म्हणाले की, 2022 साली स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त या अभियायनाची सुरुवात झाली, त्याला नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. मागील वर्षी 10 कोटी पेक्षा जास्त नागरिकांनी तिरंग्या बरोबरचा आपला फोटो संकेतस्थळावर पाठवला होता. यावर्षी या अभियाना दरम्यान देशभरात सुमारे 200 सांस्कृतिक कार्यक्रमांच आयोजन करण्यात आल असून, येत्या 13 ऑगस्ट रोजी दिल्लीत संसदेतील खासदार आणि केंद्रीय मंत्र्यांचा सहभाग असलेली तिरंगा बाईक रॅली ही काढण्यात येणार आहे, अस ही शेखावत यांनी सांगितल. दरम्यान, ऑगस्ट क्रांती दिनाचं औचित्य साधून मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून आज महाराष्ट्रातल्या हर घर तिरंगा मोहिमेला प्रारंभ होणार आहे.

**<u>राष्ट्रपति न्यूझीलंड</u>**

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू 2 दिवसांच्या न्यूझीलंड दौऱ्यावर असून आज त्या ऑकलंड मध्ये एक कार्यक्रमादरम्यान प्रवासी भारतीयांशी संवाद साधणार आहेत. न्यूझीलंड मध्ये सध्या जवळपास 3 लाख अनिवासी भारतीय राहत असून ते भारत आणि न्यूझीलंड दरम्यान संवाद सेतुचं काम करत असल्याचं राष्ट्रपति मुर्मू यांनी म्हटलं आहे. दोन्ही देशांचे राजकीय संबंध सुदृढ करण्याच्या हेतूनं भारत, ऑकलंड आणि भारतादरम्यान एक वाणिज्य दुतावासाची निर्मिती करणार असल्याचं राष्ट्रपतींनी राजकीय मेजवानी प्रसंगी जाहीर केलं.

**<u>शपथ</u>**

बांगलादेशात हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून काल नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ महंमद युनूस यांनी शपथ घेतली. बांगलादेशाचे राष्ट्रपति महंमद शाहबुद्दीन यांनी त्यांना ढाका इथ वंग भवन इथ पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी विविध देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बांगलादेशातील नामवंत उद्योगपती, बँकर आणि अर्थतज्ञ असलेले महंमद युनूस यांनी ग्रामीण बँकेची स्थापना केली असून सूक्ष्म पातळीवर कर्ज आणि अर्थपुरवठा याबाबत त्यांनी केलेल्या कार्याबद्दल 2006 मध्ये त्यांचा नोबेल पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला होता.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महंमद युनूस यांच अभिनंदन केल असून शुभेच्छा दिल्या आहेत. बांगलादेशातील परिस्थिती लवकरात लवकर सामान्य होऊन तिथल्या हिंदू आणि इतर अल्पसंख्यांक नागरिकांना सुरक्षितता बहाल होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. तसच दोन्ही देशादरम्यान विकास, शांती आणि सुरक्षेसंदर्भात काम करण्यासाठी भारत कटिबद्ध आहे असही पंतप्रधान मोदी यांनी आपल्या समाज माध्यमांवरील संदेशात म्हंटल आहे.

**वक्फ विधेयक**

वक्फ कायदा 1995मध्ये सुधारणा करण्यासाठी वक्फ- सुधारणा विधेयक 2024 संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी काल लोकसभेत सादर केलं. या विधेयकाद्वारे राज्य वक्फ बोर्डांचे अधिकार आणि कार्यप्रणाली तसंच वक्फ मालमत्तेची नोंदणी आणि सर्वेक्षणाशी संबंधित समस्यांचं निराकरण करण्याचा प्रयत्न असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. भारतीय वायुयान विधेयक 2024 देखील काल लोकसभेत सादर करण्यात आलं. केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी ही विधेयक मांडलं.

**राज्यसभा**

राज्यसभेत काल वित्त विधेयक 2024, विनियोजन विधेयक आणि जम्मू आणि काश्मीर विनियोग विधेयक मंजूर करण्यात आल. या तिन्ही विधेयकांवर राज्यसभेत चर्चा झाल्यानंतर ती पुन्हा लोकसभेकडे पाठवण्यात आली. ही विधेयके लोकसभेत याआधीच मंजूर करण्यात आली असून, यामुळे अर्थसंकल्प 2024-25 वरील कामकाज काल संसदेत पूर्ण झाल.

**जयशंकर मालदिव**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आजपासून 3 दिवसांच्या मालदिव दौऱ्यावर जाणार आहेत. दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध सुधारण हा या दौऱ्यामागचा उद्देश आहे. जून मध्ये नवी दिल्लीत झालेल्या नव्या मंत्रीमंडळाच्या शपथ ग्रहण सोहळ्याला मालदिवचे राष्ट्रपती मोहम्मद मोईज्जू उपस्थित होते. भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांचा हा पहिलाच दौरा आहे. मालदिव भारताचा एक प्रमुख शेजारी असून हिंद महासागर हा दोन्ही देशांमधील महत्वपूर्ण भौगोलिक प्रदेश असल्याचं जयशंकर यांनी म्हटलं आहे.

**ऑलिंपिक नीरज**

पॅरिस ऑलिंपिक मध्ये भारताचा भालाफेक पटू नीरज चोप्रानं 89 पूर्णांक 45 मीटर भालाफेक करत रौप्य पदकावर आपलं नाव कोरलं. स्वातंत्र्योत्तर काळात ऍथ्लेटिक्समध्ये 2 पदकं जिंकणारा निरज हा पहिलाच भारतीय खेळाडू ठरला आहे. नॉर्मन प्रिचर्ड, सुशील कुमार, पी. व्ही. सिंधु आणि मनू भाकर नंतर एक पेक्षा जास्त वैयक्तिक पदकं जिकणारा नीरज हा पाचवा भारतीय खेळाडू ठरला आहे, 2008 आणि 2012 मध्ये कास्य आणि रौप्य पदक जिंकणाऱ्या सुशील कुमार नंतर ऑलिंपिक मध्ये सलग 2 पदकं जिंकणारा नीरज दूसरा भारतीय ठरला आहे. या सामन्यात पाकिस्तानच्या अर्शद नदीम यानं 92 पूर्णांक 97 मीटर भालाफेक करत सुवर्ण पदक पटकावलं आहे.

दरम्यान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पॅरिस ऑलिंपिक मध्ये रौप्य पदक मिळवल्याबद्दल नीरज चोप्राचं अभिनंदन केलं आहे. नीरज च्या या विजयामुळे भावी पिढीला प्रेरणा मिळणार असल्याचं राष्ट्रपती मुर्मू यांनी समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. तर नीरज नं पुन्हा एकदा आपल्या सर्वोत्तम प्रतिभेचं प्रदर्शन केलं असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शहा यांनीही नीरजची प्रशंसा करताना त्याने तिरंग्याचा मान वाढवला असं आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय हॉकी संघानं कास्य पदक पटकावलं आहे. काल झालेल्या कास्य पदकासाठीच्या लढतीत भारताने स्पेनचा 2-1 असा पराभव केला. या विजयानंतर भारतीय संघावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच विविध केंद्रीय मंत्र्यांनी भारताच्या पुरुष हॉकी संघाचं अभिनंदन केलं आहे.

**बक्षीस**

ऑलिम्पिक मध्ये भारताला कांस्य पदक मिळून दिल्याबद्दल भारताच्या पुरुष हॉकी संघाला हॉकी इंडियाने बक्षीस जाहीर केल आहे. संघातील प्रत्येक खेळाडूला 15 लाख रुपये तर संघाच्या सहकारी कर्मचाऱ्यांना प्रत्येकी साडेसात लाख रुपायांच बक्षीस देण्यात येणार आहे. भारताला ऑलिम्पिक मध्ये 52 वर्षांनी सलग दुसऱ्यांदा कास्य पदक मिळालं आहे.

**पॅरिस ऑलिम्पिक**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय खेळाडू आज कुस्ती, ॲथलेटिक्स आणि गोल्फ स्पर्धेत सहभागी होणार आहेत. कुस्तीपटू अमन सेहरावत पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताच्या कुस्ती मधल्या पहिल्या कांस्य पदकाच्या लढतीत उतरणार असून पुरुषांच्या 57 किलो फ्रीस्टाइल स्पर्धेत पोर्तो रिकोच्या डॅरियन क्रुझशी त्यांची लढत होईल. ॲथलेटिक्समध्ये, भारताच्या पुरुष आणि महिला संघांचे सामने दुपारनंतर होणार आहेत. तर महिला गोल्फच्या तिसऱ्या फेरीत भारताच्या अदिती अशोक आणि दीक्षा डागर आपापले सामने खेळणार आहेत.

**जम्मू काश्मीर**

जम्मू काश्मीर मध्ये आगामीकाळात विधानसभा निवडणुका घेण्याच्या दृष्टीने आढावा घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली काल पासून दोन दिवसांचा दौरा सुरू केला. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि डॉ एस एस संधु हेही त्यात सहभागी झाले होते. जम्मू काश्मीरच अंतर्गत मूल्यांकन आणि समस्या जाणून घेण्यासाठी आयोगाने काल राज्यातील सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. तसच राज्यात निवडणूक घेण्यासाठी सुरक्षा यंत्रणा आणि प्रशासनाची तयारी जाणून घेण्यासाठी वरिष्ठ पोलिस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांशी ही संवाद साधला. आज राज्याचे मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालकांबरोबर निवडणूक आयुक्तांची बैठक होणार असून त्यानंतर सक्तवसुली संचालनालयाच्या अधिकाऱ्यांसमवेत आयोगाचे सदस्य जम्मू इथ जाऊन एक पत्रकार परिषद घेणार आहेत.

**जपान भूकंप**

जपानला काल 7 पूर्णांक 1 रीखटर स्केल तीव्रतेचा भूकंपाचा धक्का बसला. भूकंपग्रस्त भागाजवळच्या आण्विक संयंत्राला या भूकंपामुळ कोणतीही हानी झाली नसल्याचं स्थानिक माध्यमांनी सांगितलं. या भूकंपानंतर बुलेट ट्रेन सेवा थांबवण्यात आली आहे.

# याबरोबच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.